Pune Police

सत्यमेव जयते

## प्रेस नोट दिनांक १४/०९/२०१७

## चालू गाडीवर भर रस्त्यात रात्रीचे वेळी नियोजीत दरोडा टाकणारी सराईत अट्टल गुन्हेगार टोळी गुन्हे शाखा, युनिट-१, पुणे शहरच्या जाळ्यात

पुणे शहरातील चतुःश्रृंगी पोलीस ठाणे गु.र.नं. ४५८/२०१७ भादविक. ३९५,३२३,५०४,५०६ हा दाखल असून सदर गुन्हयाचा समांतर तपास युनिट १, पुणे शहर करीत असतांना, सदर गुन्हयामध्ये गुन्हा उघड होणेसाठी कोणत्याही प्रकारचा धागा दोरा उपलब्ध नव्हता. परंतु युनिट १, गुन्हे शाखेचे पो.शि. गजानन सोनुने यांना त्यांचे खास बातमी दारामार्फत, घटनास्थळी मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेज व त्यांचे तपासाचे कौशल्य यांच्या आधारे सदरचा गुन्हा हा आरोपी नामे १) सुरज उर्फ सुर्या कनूभाई राठोड उर्फ हालपटी, वय ३४ वर्षे, रा. घर नं. १४४/३, पटेल पलीया नानी दमन, दोरी कडय्या, दिव दमन २) कमलेश बाबूभाई धोडी, वय २६ वर्षे, रा. धोडीपाडा, ता. उंमरगांव, जिल्हा वलसाड, गुजरात ३) अनिल उर्फ मामा रामचंद्र आढाव, वय ४२ वर्षे, रा. दिव दमन, ४) पप्पू यादव उर्फ बिहारी (पूर्ण पत्ता माहित नाही) ५) नरेश नट्टू गामित, वय ३८ वर्षे, रा. पिथादरा, डोलवन, ता. व्यारा, जिल्हा तापी, गुजरात व अज्ञात इतर तीन इसम यांनी मिळून केलेची खात्रीशीर बातमी मिळाली होती.

आज रोजी आरोपी नामे १) सुरज उर्फ सुर्या कनूभाई राठोड उर्फ हालपटी, वय ३४ वर्षे, रा. घर नं. १४४/३, पटेल पलीया नानी दमन, दोरी कडय्या, दिव दमन २) कमलेश बाबूभाई धोडी, वय २६ वर्षे, रा. धोडीपाडा, ता. उंमरगांव, जिल्हा वलसाड, गुजरात हे सदर गुन्हयातील दरोडा टाकून चोरी केल्लेली रक्कमे पैकी २१,००,०००/- रु. घेवून स्कॉर्पीओ गाडीने दिव दमन येथून फलटण, सातारा येथे घेवून जात असलेबाबतची माहिती मिळाले वरून युनिट १, गुन्हे शाखा येथील अधिकारी व कर्मचारी यांनी चांदणी चौक, कोथरूड येथे सापळा रचून आरोपींना अटक करून त्यांचे ताब्यातून दरोडा टाकून चोरी केलेले २१,००,०००/- रु.(एकवीस लाख रुपये), एक बनावट नंबर प्लेट असलेली स्कॉर्पीओ गाडी, कि. रु. १०,००,०००/-, व दोन एअरगन कि. रु. १०००/- असा एकुण ३१,०१,०००/- रु. किंमतीचा माल जप्त करण्यात आला आहे. तसेच सदर आरोपी हे सराईत गुन्हेगार असून त्यांनी यापूर्वी त्यांचे विरुध्द दिव दमन येथे ०३ गुन्हे, तसेच गुजरात, कर्नाटक, दिल्ली,राजस्थान व इतर राज्यामध्ये बऱ्याच ठिकाणी अशाच प्रकारचे दरोडे टाकलेबाबत तपासात निष्पन्न झाले आहे.

सदरचे आरोपी हे सराईत गुन्हेगार असून त्यांनी दाखल गुन्हा करतांना त्यांचे महेंद्रा स्कॉर्पीओ गाडीवर पोलीसां सारखा लाल दिवा लावून तसेच पोलीस अधिकाऱ्याचा पोषाख घालून, पोलीसांची काठी, बेडी व अग्निशस्त्र वापरून व आपली ओळख पटवू नये अशा प्रकारे नियोजन करून रात्रीचे वेळी अंधाराचा फायदा घेवून फिर्यादीच्या चालू गाडीवर भर रस्त्यात रात्रीचे वेळी नियोजीत दरोडा टाकणारी सराईत अट्टल गुन्हेगार टोळी गुन्हे शाखा, युनिट-१ ने अटक केली आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो., पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री सुरेश भोसले सो., सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, व.पो.निरी. सिताराम मोरे, स.पो.निरी. बाबर, युनिट ३, स.पो.निरी. धनंजय कापरे, पोलीस उप-निरीक्षक, दिनेश पाटील, हर्षल कदम, पो.शि. गजानन सोनुने, पो.हवा.प्रकाश लोखंडे, इम्रान शेख, सचिन जाधव, मोहन येलपले, अशोक माने, राजु पवार, स.पो.फौज. राजाराम सुर्वे, कैलास गिरी, विजयसिंग वसावे, प्रशांत गायकवाड, मेहबुब मोकाशी, रिजवान जिनेडी, उमेश काटे, सुभाष पिंगळे, सुरेंद्र आढाव, तुषार खडके, श्रीकांत वाघवले, इरफान मोमीन, यांनी केली आहे.

पोलीस उप आयुक्त,
गुन्हे, पुणे शहर




गुन्हे शाखा,
युनिट-१ ,पुणे
शहर ची
कामगिरी